।। श्री सद्गुरु प्रसन्न ।।

# पाझर अमृताचा

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2004/14372

❖ वर्ष १० वे ❖ अंक २ ला ❖ ज्येष्ठ-आषाढ शके १९३५ ❖ ९ जून २०१३ ते ६ ऑगस्ट २०१३

प्रकाशक व मुद्रक:
**श्री प्रदीप कुलकर्णी**

मालक :
**श्रीदत्त प्रकाशन,**
श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर
{नोंदणी क्रमांक : E-17128 (M)}
संपर्क : ९८२०५४९४१५
Website - www.shridatt.org

प्रकाशनस्थळ :
**श्रीदत्त प्रकाशन,**
श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर,
डी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २,
गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

मुद्रणस्थळ :
**सुदर्शन आर्ट प्रिंटिंग प्रेस**
१०, वडाळा उद्योग भवन, वडाळा, मुं - ३१.

संपादिका : **सौ. नीता कुलकर्णी**

संपादन सहाय्य : **सौ. प्रतिभा गोखले**
**सौ. शामला आपटे**

## अंतरंग

◆ रुचि रुचि भोजन ०२

◆ भक्तगाथा ०३

◆ गोजिरवाणी ०५
- सौ. नीता कुलकर्णी

◆ शब्द तेचि छेडिता... ०६
- आकांक्षा

◆ भागिरथीच्या काठावर... ०७

◆ उत्सव विशेष ०८

◆ तरुणाई १०
- तनुजा

◆ जीवा भित्रा १३
- सिद्धेश व निशांत

◆ गुंजारव १५
- रघुनंदन

## संपादकीय...✍

'नेमेचि येतो मग पावसाळा' या उक्तीप्रमाणे दरवर्षीच पावसाळा पाऊस घेऊन येतो. तो आपला वर्षाव सर्व पृथ्वीवर करतो. परंतु त्याच पाण्याने ओढे बनतात, डबकीही बनतात. तसेच झरे व पवित्र नद्याही बनतात. डबक्यांनीही संकुचितपणा काढून टाकला व प्रवाहीपणाने ओढे, नाले, नद्या असा प्रवास केला तर डबक्यांनाही समुद्राला मिळता येईल. आपणही असे डबक्यासारखे संकुचित आयुष्य जगत असतो. 'तरुणाई' व 'जीवाभित्रा'तही असाच अनुभव वर्णिला आहे. महाराज आपल्यातील जाणीवेला प्रवाही बनवितात व थेंबुट्यासारख्या आपल्या आयुष्याला सागराचे अथांगत्व बहाल करतात.

या सर्व मार्गात अनेक टप्पे सामील आहेत. 'सदाचार' वाचताना याचा अनुभव येईल. 'मौन' म्हणजे काय हे तर नव्यानेच उमगेल. भूत व भविष्य अशा काळाच्या बंधनातच आपण अडकत असतो. तेव्हा काळाचे ओझे टाकून देऊन खऱ्या अर्थी मुक्त होऊन कसे राहायचे हे सांगितले आहे व मगच आपण निर्भय म्हणवून घेऊ शकतो.

आपल्या आयुष्यात रामायणाचे अनेक प्रसंग घडत असतात. याचा प्रत्यय 'गुंजारव' वाचताना येईल. महाराज मात्र आपल्याला ते अंगठ्याखाली न उतरता शिकायला लावतात.

महाराजांच्या शब्दानुरूप अनुभव घेत गेल्यावरच शब्द व सुरांचे कसे सुरेख मिलन होते हे 'शब्द तेचि छेडिता' वाचताना येईल.

'भक्तगाथे' तही सद्‌गुरुंच्या सहवासातील सुखाचा अनुभव वर्णिला आहे. शेवटी सागराला सर्व प्रवाहांना मिळवून घेण्याचे सामर्थ्य असते हेच खरे!

---

## रूचि रूचि भोजन

गंगेचे गोड हे पाणी। ही झारी आणिली भरोनी।।धृ.।।
ही झारी बनविली सुबक। नवविधा भक्तिचे सख्य।।
नवरत्ने जडली अनेक। भुक्ति मुक्ति दोघी बहिणी।।१।।
बोधभानू उदक प्रशांत। पहा पहा हाचि भगवंत।।
भागिरथीचे ओघ ही त्यात। तनयेची साबडी वाणी।।२।।



## भक्तगाथा...✍

याचवेळी श्री कृष्णराव बापट या नावाचे सत्पुरुष नुकतेच धारेस आले होते. बाळपणापासून भगवद्‌भक्तीचा छंद असल्यामुळे नोकरी सोडून देऊन श्रीगुरुंचा शोध करीत असताना गोकर्ण क्षेत्रीं श्रीपद्मनाथमहाराजांची त्यास भेट झाली. पद्मनाथ महाराजांनी कृष्णरावांची विरक्त स्थिति पाहून त्यांस अनुग्रह दिला व परमार्थप्राप्तीच्या अभ्यासास लाविले. कृष्णरावांचे चुलते सदाशिवराव बापट धार येथे वकीली करीत होते. सदाशिवरावांच्या घरीच कृष्णराव उतरले होते. कृष्णरावांनी पुनश्च नोकरीचा अर्ज देऊन ती संपादन करून आपला प्रपंच चालवावा असे सदाशिवरावांच्या मनात फार होते. सदाशिवरावांस काशीनाथपंत लेले यांची चांगली ओळख होती. कृष्णरावांस शाळाखात्यांत कसली तरी जागा देऊन लेलेसाहेब त्यास लावून घेतील अशी सदाशिवरावांस खात्री होती. म्हणून त्यांनी कृष्णरावांस अर्ज घेऊन लेलेसाहेब यांजकडे जावयास सांगितले व त्याप्रमाणे ते लेलेसाहेब यांजकडे गेले. परंतु त्यांची गाठ पडताच अर्जाबद्दल न बोलता कृष्णरावांनी परमार्थाबद्दलच बोलणे काढिले. कृष्णराव ज्या ज्या वेळी लेलेसाहेब यांजकडे येत असत त्या त्या वेळेस नोकरीच्या अर्जाबद्दल विचारपूस न करता वेदांत चर्चाच करीत असत. याप्रमाणे ४/५ दिवस त्यांचा क्रम चालला; नंतर काशीनाथपंतांनी कृष्णरावांस विचारले की, 'या धारा नगरीत पारमार्थिक विषयाचा भोक्ता तुम्हास कोणी मिळाला काय ?' बापट म्हणाले,'नाही', नंतर कृष्णरावांस बलभीमबोवांकडे दत्तमंदिरांत ते घेऊन गेले. परस्पर नमस्कारादिक झाल्यावर १/२ तास दोघांचा संवाद झाला. या संवादांतच दोघांचे एकमेकांवर इतके प्रेम बसले की, जणू काय हे दोघे अगदी बाळपणापासूनचे स्नेही असावेत असे इतरांस भासत होते. भाषण संपल्यावर दोघांनी परमात्मभजन व नामघोष प्रेमाने केला. त्या दोघांचे प्रेम व भजनानंद पाहून इतर मंडळीसही फारच आनंद होई. दोघे तिघे भगवद्‌भक्त एकाठिकाणी जमले म्हणजे अशीच आनंदाची लूट होत असते. 'जैसी जवळिकेची सरोवरें। उंचबळलिया कालवती परस्परें। मग तरंगासी धवळारें। तरंगचि होती।। तैसी येर येरांचिये मिळणी। पडत आनंद कल्लोळांची वेणी। तेथे बोध बोधांची लेणी। बोधेचि मिरवी।।'' या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या उक्तीप्रमाणे त्या दोघांही भगवद्‌भक्तांची स्थिति होत असे. दत्तमंदिरांत बोवांच्या पुराणाच्या अथवा भजनाच्या वेळेस बापटमहाराज येऊ लागले व उत्तरोत्तर त्यांचे परस्पर प्रेम वाढू लागले. नोकरीचा नाद अगदी सोडून

दिला व कृष्णराव बोवांबरोबर भजनानंदांत रमू लागले. कृष्णराव यांचा भर विशेष करून तटस्थ स्थितीवर फार असे व त्या स्थितीसच ते समाधि समजत असत. परंतु ती त्यांची समजूत बोवांनी मोठ्या युक्तीने काढून त्यांस समाधिस्थितींचें खरे लक्षण समजून दिले. कृष्णराव व बोवा यांची वेदांत विषयावर चर्चा एकमेकांत फार बहारीची होत असे. काही दिवस धारेस राहून नंतर कृष्णराव बोवांचा निरोप घेऊन परगावी गेले.

श्री. काशीनाथपंत लेले यांनी लावून दिलेली धार येथील नोकरी सोडून गणपतराव तांबे सन १९०१ चे सुमारास देवास येथे गेले. तेथेही शाळाखात्यातच पुन्हा त्यास नोकरी मिळाली. गणपतरावांनी विचार केला की, आपणास या ठिकाणी चांगली नोकरी लागली आहे व आता येथे आपले गुरूमहाराज बलभीमबोवा आले तर त्यांचा समागम आपणास होऊन त्यांची सेवाही यथाशक्ति होईल. याप्रमाणे मनात विचार केल्यावर त्यांनी बोवांस देवाशास येण्याबद्दल आग्रहाचे विनंतिपूर्वक पत्र पाठविले. शिष्याची विनंति मान्य करून पत्राप्रमाणे बोवाही कुटुंबासह देवाशास आले. त्यावेळी गणपतराव देवास येथील डोंगरे यांच्या वाड्यात तळमजल्यात रहात असत व गणपतरावांनी बोवांकरिता राहण्यास जागा वरील मजल्याची घेऊन ठेवली होती व त्या जागेत बोवांची सर्व व्यवस्था त्यांनी लावून दिली. देवास येथे आल्यावर धार प्रमाणेच सकाळ संध्याकाळ भजन, पूजन, पुराण, कथा वगैरे गोष्टींचा कार्यक्रम सुरु झाला. बोवासाहेब दररोज निरनिराळ्या आळीत हिंडून कोरडी भिक्षा मागत असत. कोणी पृच्छा केल्यास दोन पारमार्थिक गोष्टी बोलत. देवास येथील कै. रा. कुंटे, कै. रा. गंगाधर नारायणशास्त्री एम.ए. शाळाखात्याचे सुपरिटेंडेंट, श्री. रा. शिवराम नारायण लोंढे कमाविसदारसाहेब (हे बलभीमबोवांच्या प्रमुख शिष्यांपैकी एक होते) वगैरे मंडळींच्या घरी बोवा भिक्षेस जात असत. बोवांचा सरळ, निष्कपट व नम्र स्वभाव पाहून या सर्व मंडळीसच नव्हे तर सर्व आबालवृद्धांस त्यांचे विषयी एकप्रकारचा आदर व प्रेम वाटे. थोडक्याच कालात बोवांची प्रसिद्धि सर्व गावात झाली. रा.रा. शिवरामपंत लोंढे यांचे घरी बोवा भिक्षेस आले की, त्यास ते घरी बसवून घेत असत व तास अर्धातास काहीतरी पारमार्थिक चर्चा करीत. याप्रमाणे काही दिवस गेल्यावर गणपतरावांच्या बिऱ्हाडी श्रीज्ञानेश्वरीचे प्रवचन बोवांनी सुरु केले. ही वार्ता कानी पडताच रा. शिवरामपंत

**पान नं. ९ वर**



# गोजिरवाणी...✍

**- सौ. नीता कुलकर्णी**

**आजी -** आज मी तुम्हाला एक मजेशीर गोष्ट सांगणार आहे.

**मुले -** सांग ना आजी!

**आजी -** अरे, एक पाणक्या होता. तो रोज मालकाकडे पाणी भरीत असे. त्याच्याकडे काठीला लावलेली दोन भांडी होती. त्यातील एक भांडे चांगले होते तर दुसरे गळके होते.

**मुले -** मग काय झाले?

**आजी -** अरे, या चांगल्या भांड्याला गर्व झाला होता, तो पूर्णपणे पाणी वाहतो म्हणून! तर गळक्या भांड्यास मात्र वाईट वाटत असे. एके दिवशी गळके भांडे पाणक्याशी बोलू लागले व म्हणाले, ''मी तुझी पूर्ण मदत करत नाही. तू मला पूर्ण भरतोस पण मी मात्र अर्धेच पाणी तुला देतो.'' पाणक्या दयाळू होता. त्याने त्या गळक्या भांड्यास आजूबाजूस बघायला सांगितले. तेव्हा त्याला सगळीकडे फुलांनी भरलेली फुलझाडे दिसली.

**मुले -** ती कशी काय?

**आजी -** अरे, पाणक्याने गळणाऱ्या भांड्याच्या दिशेला रस्त्याच्या कडेला फुलांच्या बिया टाकल्या होत्या. त्याला रोजच आपोआप पाणी मिळत होते तर दुसऱ्या कडेला मात्र काहीच नव्हते.

**मुले -** किती हुशार होता ना तो पाणक्या!

**आजी -** अरे, गुरुदेवही असेच असतात. आपण मात्र स्वतः वर नेहमीच रुसलेलो असतो. पण ते आपल्यातील गुणदोष जाणून असतात. आपल्या दोषांनाही ते गुणात बदलून टाकतात.

**मुले -** ते कसे?

**आजी -** एखाद्याला उगीचच ओरडायची सवय असेल तर त्याला भजन म्हणायला लावतात, एखाद्याला कडक बोलायची सवय असेल तर त्याला एखादे काम करवून

**पान नं. ९ वर**

# शब्द तेचि छेडिता...

- आकांक्षा

**तेरे सूर और मेरे गीत। दोनो मिल कर बनेगी प्रीत**

धडकन में तू है समाया हुआ। खयालों मे तू ही तू छाया हुआ।

दुनिया के मेले में लाखों मिलें। मगर तूऽऽही तू दिल को भाया हुआ।

मै तेरी जोगन तू मेरा मीत। दोनो मिल कर बनेगी प्रीत।

हे गाणे एका जुन्या सिनेमातले आहे, जे लहानपणी ऐकले होते. पण त्याचा अर्थ मात्र आता उमगु लागलाय!

सूरांच्या समूहाने धून बनते व हेच मधूर सूर मनाला भावून जातात. त्यातच सुंदर शब्दांची भर पडली की श्रवणीय गाणे तयार होते व मनाला आनंद देते.

हे जसे बाहेरील सूर व शब्दांचे, तसेच गुरुघरच्या ज्ञानाचे आहे. गुरूदेव आपल्याला सतत ज्ञान देत असतात, वेगवेगळे उपक्रम राबवित असतात की जेणेकरून आपली अभ्यासात प्रगती व्हावी. पण आपण आपल्या बाजूने प्रयत्न केला नाही तर पुढे कसे जाणार? गुरुदेवांना आपल्याला त्या आनंदाची गोडी चाखवायची असते. पण त्यासाठी आपण एक पाऊल पुढे टाकले पाहिजे. जेंव्हा त्यांचे व आपले सूर जुळतात व शब्द एकत्र बांधले जातात तेंव्हाच खरे प्रेम म्हणजे काय याचा अनुभव येतो.

प्रीत म्हणजे प्रेमाची रीत! परेच्या पलिकडे जाऊन मकार ओलांडून सर्वदूर सर्वांतरात्मा मीच आहे असे ज्यांच्या वागण्या बोलण्यातून आपल्याला अनुभवाला येते ते सगुण सद्‌गुरु! त्यांच्यामुळे आपणही दुसऱ्यांवर प्रेम करायला शिकतो.

जसाजसा हा प्रेमाचा धागा आणखीन घट्ट होत जातो, तसे कळते की आपल्या हृदयात तेच बसलेले आहेत. आपल्या विचारात मग त्यांच्याशिवाय दुसरे नसते. जर बोधाआधीचा प्रवास आठवला तर लक्षात येते की असे प्रेम देणारे कोणी भेटलेच नाही. नात्यांमधूनही एवढं निखळ प्रेम मिळत नाही. त्यांचे प्रेमही कसे? तर ते आपल्याला एकत्वाकडे नेते. म्हणूनच असे वाटते की त्यांच्याशिवाय आपले दुसरे कोणीच नाही!

■■■



# भागिरथीच्या काठावर बसले असताना अंगावर उडालेले ज्ञानतुषार...✍

## सदाचार

१४) मौन तेचि स्वाध्ययन। ब्रह्मचिंतन ते ध्यान।

ज्ञाने वाणी मन निषेधन। दर्शन उत्तम ध्येयाचे।।१४।।

**अर्थ -** मौन हेच वेदाध्ययन व ब्रह्माचे चिंतन हेच ध्यान आहे, ज्ञानाने वाणी व मनाचा निषेध केल्यावर उत्तम ध्येय म्हणजेच ‘परब्रह्म मी’ चे दर्शन होते.

**भावार्थ -** मौन म्हणजेच वेदाध्ययन आहे. वाणीवर ताबा ठेवून मौन धरले जाते व मनामध्ये इतर विचार चालू असतात, हे मौन इथे अभिप्रेत नाही. गुरुदेवांची वाणी ही परावाणी असते. त्यामुळे तेथे बरे-वाईट वा सत्य-मिथ्या असा भेद नसतो. त्यांच्या मुखातून आलेले सगळे अद्वैतातलेच असते. त्यामुळे ते त्यांचे मौनच असते व ब्रह्माचे चिंतन हेच ध्यान असते. तसेच साधकासाठी इतर सारे उपेक्षून फक्त गुरुमुखाने श्रवण हेच मौन होय!

ज्ञानाने वाणी व मन दोन्हीचा निषेध केल्यानंतर जे उत्तम ध्येय म्हणजे ‘परब्रह्म मी’ चे दर्शन होते. म्हणजेच डोळ्यांना दृश्य नसलेल्याचे दर्शन होते. खरे तर हेच सर्वोत्तम असे ध्येय आहे जे साधकाने साधले पाहिजे.

१५) मागील झाले न स्मरता। होणार काय न चिंतीता।

रागद्वेषाविण येथे प्राप्ता। भोगितो शुभाशुभ।।१५।।

**अर्थ -** पूर्वी म्हणजेच भूतकाळात जे झाले त्याची आठवण न ठेवता व पुढे म्हणजेच भविष्यकाळात जे होणार आहे याची चिंता न करता राग व द्वेषाच्या शिवाय प्राप्त झालेले शुभ व अशुभ भोगले जाते.

**भावार्थ -** एखादे स्वप्न पाहिल्यावर त्याचे परिणाम स्वप्नातून जागे झाल्यावर राहत नाहीत. भीतीयुक्त स्वप्नाची भीती जाग आल्यावर राहत नाही, सुख व दुःख जरी स्वप्नात भोगले तरी त्याचेही जागेपणी परिणाम दिसत नाहीत. अगदी तसेच ज्ञान्याचे असते. देहाने भूतकाळात जे भोग भोगले असतील त्याचे स्मरण ज्ञान्याला

असत नाही. तसेच पुढे काय होणार आहे याचे चिंतनही तिथे नसते. कारण प्रारब्ध हे देहालाच असते याचा अनुभव त्यांच्याकडे असतो. प्रीती किंवा द्वेष टाकून शुभ किंवा अशुभ दोन्हीही भोगले जाते. पाप पुण्याचा स्पर्शही ज्ञान्याला नसतो.

१६) निर्भयता सर्व भूतांची। ज्ञाते बोलती हेचि
अवधि जाणा वैराग्याची। ब्रह्मी स्पृहा अन्य नसे।।१६।।

**अर्थ** - सर्व भूतांची भीती न राहता पूर्णपणे निर्भय होणे हेच ज्ञान्याचे बोलणे असते. अन्यथा वैराग्य वाढवावयास हवे. खऱ्या ज्ञान्याला दुसरी कुठलीही इच्छा नसते.

**भावार्थ** - मागील श्लोकात उल्लेख केल्याप्रमाणे जेव्हा पूर्णपणे देहभाव नाहिसा होतो, तेव्हाच खरी निर्भयता प्राप्त होते. देहाच्या अंगाने कुठलीच भीती उरत नाही. माझा 'मी'च सर्वत्र पसरलेला आहे हे आकलन झाल्याने द्वैतभावाने निर्माण होणारी भीती नष्ट पावते. खरा ज्ञानी हेच बोलत असतो. इतर निर्भयतेच्या गोष्टी हे विपरीत ज्ञानच होय. अशी निर्भयता प्राप्त नसेल तर वैराग्य वाढवावयास हवे. कारण ज्ञान व वैराग्य हे एकमेकांस सहाय्यभूत आहेत. वैराग्याने नामरूपाचा त्याग करता येतो व ज्ञानाने ब्रह्म जाणता येते. पुढे द्वैत टाकून ज्ञानी निजांगे ब्रह्म होतो.

पूर्ण ब्रह्मरूप झालेल्यास अन्य कुठलीही स्पृहा म्हणजेच इच्छा नसते. देहाच्या अंगाने इतर कुठल्याच इच्छा तेथे उरत नाहीत.

■■■

# उत्सव विशेष...

## श्रीनृसिंह जयंती उत्सव

**वैशाख शु. नवमी ते वैशाख कृ. प्रतिपदा दि. १९ मे ते २६ मे २०१३**

### मूळपद

स्मरता नित्य हरी। मग ती माया करी।।धृ.।।
नामरूपात्मक सकळही नाशक। निश्चय हा विवरी।।१।।
शांतिदयापर श्रवणी सादर। भव भ्रम न उरे उरी।।२।।
सहज पूर्ण निजरंगी रंगूनी। सद्गुरु पाय धरी।।३।।



पान नं. ५ वरून

लोंढे, कै. बळवंतराव पटवर्धन, देसाई मास्तर, कहाळकर मास्तर, गंगाधरशास्त्री वगैरे बरीच विद्वान मंडळी दररोज श्रवणास येऊ लागली. देवासच्या मोठ्या पातीचे कारभारी रा.ब. रावजी जनार्दन भिडे यांसही, बोवांची ख्याति कानावर आल्यामुळे त्यास बोवांचे प्रवचन व कीर्तन ऐकण्याची इच्छा झाली व एके दिवशी ते स्वतः प्रवचनास आले. प्रवचन श्रवण करताच त्यास बोवा कोणीतरी साक्षात्कारी महात्मा असावा असे निश्चित वाटले. तेव्हापासून ते बोवांचे कीर्तनास अथवा प्रवचनास नित्य येत असत. रा.ब. भिडे हे फार विद्वान, मार्मिक व रसिक श्रोते होते. बोवांवर त्याचे फार निस्सीम प्रेम होते. कधी कधी बोवांचे वेदेश्वरीवर प्रवचन रा. गंगाधरशास्त्री यांच्या घरी होत असे. तेथे श्रवणास बरीच मंडळी जात असत. गंगाधरशास्त्री थिऑसफिस्ट होते. बोवांची साधी राहणी व प्रेमळ वर्तन पाहून बोवांविषयी गंगाधरशास्त्री यांचे मनात फार आदर वाटे. बोवासाहेबांबरोबर ते वारंवार वेदांत चर्चा करीत असत.

■■■

पान नं. ५ वरून

घ्यायला लावतात, एखादा जर लाजाळू असेल तर त्याला कायेने सेवा करायला लावतात.

**मुले** - खंरच आजी!

**आजी** - अरे, जसे पाणक्या चांगल्या भांड्यातूनही पाणी वाहून नेत असे तसेच महाराज आपल्या सद्गुणांचा उपयोग तर करायला शिकवतातच पण तेही निरहंकारी राहून!

**मुले** - खरेच आजी एका भांड्याला गर्व होता तर दुसऱ्याला न्यूनगंड!

**आजी** - अरे, महाराज अहंकाराचे निर्दालन तर करतातच पण आत्मविश्वास गमावलेल्याला तो परतही मिळवून देतात. म्हणूनच तर त्यांच्या सहवासात सगळे एकाच पातळीवर असतात.

**मुले** - खरेच आजी, यापुढे आम्ही आमचे गुण-दोष जाणून घेऊ व दोषांनाही गुणांमध्ये बदलून टाकू!

**आजी** - शाबास! अशीच प्रगती करा! ■■■

# तरुणाई...✍

**- तनुजा**

## भूमिका

एका पुस्तकात वाचलं होतं एकदा... दुर्योधनाच्या तोंडी एक वाक्य होतं... पक्कं लक्षात राहिलंय ते माझ्या! ''मी असं असं वागतो कारण माझ्या आतून कुठली तरी एक शक्ती मला तसं वागायला प्रेरित करीत असते. बघताना त्याचे परिणाम वाईट दिसत असतील. पण वागताना मी चुकीचं वाईट, दुष्ट म्हणून कधीच वागत नसतो.''

'मला' वाटणाऱ्या भावनेशी प्रामाणिक राहणंच झालं ना हे!

लहानपणापासून शिकवलं जातं... हे 'असं' वागणं म्हणजे 'चूक'... हे 'असं' वागणं म्हणजे 'बरोबर'... हे योग्य... हे अयोग्य...! आणि आपण तसं-तसं वागत जातो... चूक-बरोबर, योग्य-अयोग्य या व्याख्याच मुळात खूप सापेक्ष! 'कोणाच्या दृष्टीने?' हा प्रश्न उरतोच न! शिवाय या दोन टोकाच्या भूमिकांच्या मध्ये याच दोघांच्या असंख्य शेडस् असतीलच ना! त्या कधीच कोणी दाखवत नाही...

एखादी व्यक्ती रडते आणि तिला सहानुभूती मिळते... म्हणून मग रडणं चांगलच असणार... त्यामुळे तसा प्रसंग पुढे माझ्या आयुष्यात घडला कि मग 'मी' पण रडणार... अरे, पण मला खरचं रडावसं वाटतंय का? याच्या अगदी उलट... मी 'पुरुष' आणि पुरुष कधी रडत नसतात! म्हणून मग मला कितीही रडावसं वाटलं तरी मी ते दाबूनच ठेवणार... चार लोक हसतात म्हणून मीही हसणार... पण मला खरच हसू येतंय का? कुणीतरी खूप अभ्यास करून चांगला पैसेवाला झाला...म्हणून मीही शिकणार... अभ्यास करणार... आवड नसताना... मला सचिन तेंडुलकर व्हायचंय... मला माधुरी दिक्षित बनायचंय... मला माझ्या आईसारखी गृहिणीच रहायचय...

एक मैत्रीण आहे माझी... जन्मतःच डावरी... हातावर फटके मारून मारून तिच्या आपसूक पुढे येणाऱ्या डाव्या हाताला मागे खेचून उजव्या हाताचा नंबर लावण्याचा आडमुठेपणा घराच्या माणसांनी केला... आणि आता परिस्थिती अशी आहे की तिच्या डाव्या हाततही धड जोर नाही आणि उजव्या हाततही!

तो रोज नवीन गर्लफ्रेंड फिरवतो म्हणून मग मीही तसचं करणार... नाहीतर



मित्र मला षंढ समजतील. मी पण त्यांच्या सारखाच दारू, सिगारेट ही व्यसनं करणार.. पण मला खरचं त्यात स्वारस्य आहे का? की बहिणीला अभ्यासात मदत करणं, आईसाठी भाजी आणून देणं, वडिलांची बँकेची कामं करणं या गोष्टी मला मनापासून आवडतात? किंवा अशीही परिस्थिति... घरच्यांचं सगळ मी मुकाट्याने ऐकतो, करतो... पण मनाची मात्र कुतरओढच होते...

मला पण त्याच्यासारखी मोठी गाडी घ्यायची आहे... माझा बॉयफ्रेंड तिच्या बॉयफ्रेंड सारखा टॉल, डार्क, हँडसमच असला पाहिजे. मला माझ्या मुलाला त्याच्या मुलासारखा गायकच बनवायचं किंवा माझ्या गायक होऊ पाहणाऱ्या मुलाला मला शास्त्रज्ञ बनवायचं!

याच्या-त्याच्या सारखं असण्यातच आपल्याला अभिमान! 'मी', 'माझ्यासारखं' असणं गैर आहे का?

'मी' कसं वागायचं याचे मापदंड माझ्या सभोवतालच्या व्यक्ती ठरवणार! आणि त्यांनी आखलेले मापदंड पूर्ण करण्यासाठी मी कंबर कसणार!

भला उसकी साडी मेरे साडीसे सफेद कैसे?

काय हो... लहानपणापासून मनात ठसवलेल्या देवाच्या प्रतिमेमध्ये तुम्हाला खरचं तुमचा देव सापडलाय का? कि चारचौघे करतात म्हणून तुम्हीही खोटी श्रद्धा बाळगून नतमस्तक होताय?

दुसऱ्याच्या भूमिकेमध्ये कळत नकळत आपण शिरतो आणि त्यांची भूमिका जगायला लागतो! माझी भूमिका इतरांपेक्षा वेगळी असू शकते ना पण! अर्थात वेगळीच असावी हा अट्टाहास करणंही त्रासदायकच! सर्वसामान्यपणे जगण्यात सुद्धा आनंद असू शकतो ना! पिझ्झा खाऊन पोट भरत तसं वरण भात खाऊन सुद्धा भरतच ना! कॉफी... मग ती कोणत्याही आकाराच्या, रंगाच्या, नक्षीच्या कपात असली तरी ती कॉफी सारखीच लागणार ना! आंब्याच्या झाडाला शेवग्याच्या शेंगा कशा येतील? एखाद्याच्या एखाद्या गोष्टीतलं श्रेष्ठत्व मलापण हवयं... पण नेमकं त्याच गोष्टीतलं श्रेष्ठत्व तुझ्याकडे आहे का? त्याच्यामागे लागतो तर माझ्याकडे असणाऱ्या 'माझ्या' गोष्टींवर दुर्लक्ष करून 'मी' 'माझ्यावर' अन्याय करतोय असं नाही का होणार?

माझी भूमिका मला खुलवायची आहे. माझ्यातलं कसब मला शोधायचं आहे. 'मी' 'दुबळी' आहे तर 'हो, मी दुबळी आहे!' हे मला स्वीकारता आलंच पाहिजे. स्वीकारलं की मग त्यात बदल करणं साध्य होतं. तसंच 'मी' 'राजा' आहे तर 'हो, मी राजा आहे!' हेही स्वीकारता आलं पाहिजे. त्यानुसार भूमिका साकारली पाहिजे! भूमिकांची गल्लत करून कसं चालेल? मी शोधायचा प्रयत्न केलाय का कधी 'माझ्या भूमिकेचे कंगोरे'? माझ्यातले गुण स्वीकारले तसे माझ्यातले दोष स्वीकारले का? डेस्टीनेशन एकच... मात्र तिथे पोहोचण्याचे मार्ग हे प्रत्येकासाठी भिन्न असू शकतात न! मग माझी वाट सोडून दुसऱ्याच्या वाटेने जाण्याचा अट्टाहास का? इतरांची वाट... मग ती फुलांनी लगडलेली असो किंवा काट्यांनी भरलेली... हो, फुलांचं आकर्षण असतं तसंच काट्यांचही असतं! हे आकर्षणच कशासाठी? माझ्या वाटेत फुलं आली तर ती उधळायची आणि काटे आले तर तेही स्वीकारायचे... काहीही जरी असलं तरी ते 'माझं' असेल... फुलांना काटे आणि काट्यांना फुलं बनवण्याचा अट्टाहास नकोच ना! काट्यांना फुलं समजून स्वीकारण्याचा पोरखेळ सुद्धा नकोच! काट्यांना काटे म्हणूनच आपलंस करा ना राव! म्हणजे मग आदर राहील प्रत्येकाच्याच अस्तित्त्वाचा!!!

शेवटी 'भूमिका भूमिका' म्हणजे तरी काय? जगन्नियंत्याने प्रत्येकाला दिलेला तो रोलच नाही का? आपण आपली भूमिका छान वठवायची, अपेक्षांचे ओझे किंवा राग लोभाला वगळून! मगच आपल्या ध्यानात येऊ लागेल की भूमिकेहून तर 'मी' वेगळाच आहे!

■■■

> रत्नपारखी गारगोट्यांतून हिरा बाहेर काढतो, त्याप्रमाणे सद्‌गुरु तत्त्वरूपी गारगोट्यांतून 'ब्रह्म हिरा' बाजूला काढतात व तुमच्याच जवळ असलेला 'आत्महिरा' सापडवून देतात. 'आत्महिरा' मिळाल्यावर हिरमुसले न राहता अंतरबाह्य आनंदी असले पाहिजे
>
> - श्रीसस भागीरथीनाथ



# जीवा भित्रा...✍

**- सिद्धेश व निशांत**

**भीरू** - अरे रामू, चहा आण बरं! कुठे कडमडला हा कोण जाणे! चला, आजचा पेपर तरी वाचू तोपर्यंत! भविष्य... काय लिहीलयं बरं? (घाबरून) जीवाला धोका? मेलो! मेलो! वाचवा!!

(पळत पळत रामू येतो.)

**रामू** - काय झाले मालक? अहो ओरडताय काय?

**भीरू** - अरे, बघ भविष्यात काय लिहिलयं माझ्या, जीवाला धोका!

**रामू** - साहेब, शांत व्हा बरं! मी तुम्हाला चहा आणून देतो. (रामू चहा घेऊन येतो.)

**रामू** - मालक, हा चहा घ्या बरं आधी!

(रामू चहा देऊन आत जातो.)

**भीरू** - अरे देवा, काय करू मी? केवढा गरम चहा! कदाचित हा चहा पितानाच माझा घसा भाजून जखम होईल, नी मी मरतो की काय? (फुंकून फुंकून चहा पिऊ लागतो.)

(स्वत:शीच) कसे बरं जाऊ ऑफिसला? ट्रेनने? नको बाबा, ट्रेनमध्ये चेंगराचेंगरीत प्राण जातील! मग बसने? नकोच, बसमध्ये अपघात होतात. चालत चालतच जाऊ, होईल तेवढे नी मग टॅक्सी करू! तेवढेच सुरक्षित!

(रामूला उद्देशून) रामू, मी निघालो रे ऑफिसला!

**रामू** - सांभाळून जा मालक! घाबरू नका.

(रस्त्याने चालताना लोकांना बाजूला करीत करीत हळूहळू जाऊ लागतो.)

**भीरू** - (लोकांना उद्देशून) लोक हो, बाजूला होऊन मला वाट द्या. आज माझे काही खरे नाही. कृपा करून मला रस्ता मोकळा ठेवा.

(सर्व लोक वेडा समजून हसून बाजूला होतात. रस्त्याच्या कडेला पोपट घेऊन ज्योतिष सांगणारा एकजण बसलेला असतो. 'तोडगे बाबा' असा बोर्ड असतो.)

**भीरू** - बरं झालं! यालाच विचारू. अहो माझे भविष्य सांगा ना!

**तोडगे बाबा** - सांगतो सांगतो, हा माझा पोपट बरोबर भविष्य सांगतो. परंतु

तुम्हाला माझी फी मात्र द्यावी लागेल.

**भीरू** - बरे, आधी सांगा तरं!

**तोडगे बाबा** - (पोपट एक चिठ्ठी काढून बाबाच्या हातात देतो. तो वाचू लागतो.) जीवास जपणे! धोका संभवतो.

**भीरू** - बापरे! मी आता काय करू? देवा मला वाचव!

**तोडगे बाबा** - घाबरू नका! मी यावर एक तोडगा सांगतो.

**भीरू** - सांगा सांगा, लवकर सोडवा मला यातून!

**तोडगे बाबा** - पण तुम्हाला मात्र आता अधिक किंमत मोजावी लागेल.

**भीरू** - बोला!

**तोडगे बाबा** - तुमच्या पाकीटातील सर्व पैसे!

**भीरू** - हे जरा जास्तीच आहे नाही का?

**तोडगे बाबा** - बघा बुवा, नाही सांगत मग!

**भीरू** - बरं बरं, देतो सगळे पैसे!

**तोडगे बाबा** - आणि तुमचे घड्याळ व गळ्यातली चेन...

**भीरू** - अहो, मग मी कंगालच होईन की!

**तोडगे बाबा** - मग राहीलं!

**भीरू** - घ्या, सगळे घ्या, पण सांगा पटकन! माझा अंत पाहू नका.

(सगळे पैसे व वस्तू त्यास देतो.)

**तोडगे बाबा** - इथून घरी गेल्यावर दोन पावले पुढे जा. नंतर पाच पावले डावीकडे व चार पावले उजवीकडे जा. नंतर एकवीस वेळा आंधोळ करा! वाचेल तुमचा जीव!

**भीरू** - (घाईघाईने) बरं, बरं, येतो मी! (घरी परत येतो. रामूने दार उघडल्यावर दोन पावले पुढे व पाच डावीकडे व चार पावले उजवीकडे जातो.)

**भीरू** - रामू, मला जरा पाणी दे बाबा! आणि आंघोळीला गरम पाणी काढ. (रामू फरशी पुसत असतो. तो फिनाईलची बाटली टेबलावर ठेवतो व पाणी आणायला जातो. पाण्याची बाटली फिनाईलच्या बाटली शेजारी ठेवतो व फरशी पुसू लागतो.)

**रामू** - साहेब आज पेपरवाला आलाच नाही.



(भीरू घाईघाईने पाणी समजून फिनाईची बाटली तोंडाला लावणार तोच मालकाला उद्देशून रामू ओरडतो.)

**रामू** - मालक ती फिनाईलची बाटली आधी खाली ठेवा. पाण्याची बाटली दुसरी आहे.

**भीरू** - अरे देवा, मी फिनाईल पिऊन बसलो असतो. रामू तूच खरं तर मला वाचवलंस! पण मग मी सकाळी वाचलेला पेपर, ते भविष्य?

**रामू** - हा तर कालचा पेपर आहे.

**भीऊ** - म्हणजे ते भविष्य कालचेच होते. मी मात्र त्या बाबाला सगळे देऊन बसलो चेन, पाकीट, घड्याळ...

**रामू** - हे काय केलं तुम्ही मालक! शांत व्हा बरं तुम्ही! जाऊ दे, जीव तरी वाचला ना! पण लक्षात ठेवा मालक, '**भित्यापाठी ब्रह्मराक्षस**'!

---

## गुंजारव...

**- रघुनंदन**

कौसल्येपोटी आले पायसदान। अयोध्येसी लाभले वरदान।।
विश्वामित्रे सहाय्ये चालविला बाण। सीतापती झाले रघुनाथ राम।।१।।
मानोनी पित्याचा शब्द प्रमाण। कैकयी मातेसी करोनी वंदन।।
वनवासी केले पादाक्रमण। सोडोनी सर्व माया बंधन।।२।।
गोदावरी तीरे वसविले ब्रह्मांड। संगे सीता बंधु लक्ष्मण।।
हरण होताचि केले सुग्रीव शोधन। आश्रमी केले शबरीचे कल्याण।।३।।
ऋष्यामुखी पोहोचले भगवान। जाहले मिलन राम-हनुमान।।
केले त्या वालीचे मर्दन। जाहले सुरु लंका आक्रमण।।४।।
मिळाला भगवंतासी तो बिभीषण। नमता वरूण केले सेतू बंधन।।
अगाध महिमा प्रभू मायेची खाण। 'राम राम' गर्जे वानरगण।।५।।
केले कुंभकर्ण-रावण मर्दन। झाले सीतेचे अग्नी परिक्षण।।
केले स्थापन राज्य बिभीषण। अयोध्येसी परतले भगवान।।६।।
गाजविले प्रभूने राज्य राम। सर्वत्र जाहले राम विश्राम।।
ऐसे हे त्रेतायुगे रामायण। गुरूदेवापदी रघुनंदन लीन।।७।।

श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर, डी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २, गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

To,

BOOK-POST

## संस्थेतील प्रमुख सप्ताह व उत्सव

**श्री स.स. दत्तात्रय महाराज जयंती उत्सव**
पौष कृ.१

**महाशिवरात्र उत्सव**
माघ कृ १३

**श्री स.स. भागिरथीनाथ पुण्यतिथी उत्सव**
रंगपंचमी फाल्गुन वद्य ५

**नृसिंह जयंती उत्सव**
वैशाख शु. १३

**गुरुपौर्णिमा उत्सव**
आषाढ शु. १५
दि. १४ जुलै ते २३ जुलै २०१३

**श्री स.स. माधुरीनाथ वाढदिवस उत्सव**
श्रावण शु. १३ परम १४
दि. १३ ऑगस्ट ते २० ऑगस्ट २०१३

**श्री स.स. दत्तात्रय महाराज पुण्यतिथी उत्सव**
कार्तिक कृ. १
दि. १० नोव्हें. ते १९ नोव्हें २०१३

## मंदिरात केले जाणारे अन्य उपक्रम

| | |
|---|---|
| **श्री स.स. बलभीममहाराज जयंती** | - गुढीपाडवा - चैत्र शु. १ |
| **श्री स.स. लक्ष्मणमहाराज जयंती** | - वसंतपंचमी - चैत्र शु. ५ |
| **श्रीरामनवमी** | - चैत्र शु. ९ |
| **श्री स.स. नारायण महाराज जयंती व पुण्यतिथी** | - आषाढ कृ. ५ |
| **श्री स.स. भागिरथीनाथ जयंती** | - आषाढ व. १५ दीप अमावस्या |
| **श्रीकृष्णजयंती** | - श्रावण कृ. १ ते ८ |
| **श्री स.स निरंजनस्वामी पुण्यस्थिती** | - परिवर्तीनी एकादशी- भाद्रपद शु. ८ |
| **श्री. स.स. बलभीममहाराज पुण्यतिथी** | - इंदिरा एकादशी - भाद्रपद व. ११ |
| **नवरात्र** | - अश्विन शु. १ ते ११ |
| **श्री स.स. निरंजनस्वामी जयंती** | - कार्तिक शु. ८ |
| **श्रीदत्तजयंती** | - मार्गशीर्ष १५ |
| **दासनवमी** | - माघ व.१ ते ९ |